# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड      जा.क्र.  204 / 2023        दिनांक : 24.05.2023

## 1)दरोडयाची तयारी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 22.05.2023 रोजी चे 23.50 वा. चे सुमारास, **बोंडार बायपास रोड वरिल एकरा शाळेजवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद 06 आरोपीतांनी संगणमत करून बोंडार बायपास रोडवरील एकरा शाळेजवळ आंधारात दबा धरून रस्त्यावरील येणारे जाणारे प्रवाशावर दरोडा टाकण्याचे व दरोडयाच्या तयारीत असतांना घातक शस्त्र व अग्णीशस्त्र बाळगुन दरोडयाच्या साहीत्यासह मिळुन आले. दोन आरोपी अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री आनंद मारोती बिच्चेवार, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 358/2023 कलम 399, 402 भादवि सह कलम 3/25, 4/25 शस्त्र अधिनियम 1959 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री जाधव, मो. नं. 9823352701** हे करीत आहेत.

## 2)अवैध रेती चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 22.05.2023 रोजी चे 03.20 वा. चे सुमारास, **काळेश्वर कमानीजवळ विष्णुपूरी ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिरीत्या आडीच ब्रास रेती किंमती 12,500/–रूपयाची टिपर क्रं एमएच–12/डीटी–6340 किंमती 4,00,000/–रूपयाचा असा एकुण असा एकुण 4,12,500/–रूपयाचे मालासह चोरटी विक्री करण्याच्या उद्दशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी मपोउपनि/श्रीमती स्नेहा सखाराम पिंपरखेडे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 359/2023 कलम 379, भादवी, सह कलम 48 गौण खनिज अधिनियम 1966 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जामोदकर, मो. क्र. 9923895077** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)कंधार :–** माहे जानेवारी 2022 ते दि.17.08.2022 रोजी चे 00.01 वा. चे दरम्यान, **मौ. धामणगाव ता. जळकोट फिर्यादीचे सासरी ह. मु. स्वप्नभुमीनगर कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद दहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस नवीन घर खरेदी करण्यासाठी 10,00,000/–रूपये घेवुन ये म्हणुन थापड बुक्क्याने मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व मानसिक छळ केला. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 153/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2059 सानप, मो.क्रं. 9421849989** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :–** सन 2016 पासुन ऑगष्ट सन 2019 चे दरम्यान, **ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून तुला मुलबाळ होत नाही तु दिसायला चांगली नाहीस असे म्हणुन तुझे माहेरहुन ॲटो घेण्यासाठी व घर खर्चासाठी पाच लाख पन्नास हजार रूपये देवुन सुध्दा अजुन शेती घेण्यासाठी दोन लाख रूपये का घेवुन येत नाहीस असे म्हणुन सतत तगादा लावुन मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 35 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 111/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** मपोउपनि/**ए के सय्यद, मो.क्रं. 8975769508** हे करीत आहेत.

## 4)फसवणुक :–

**1)मांडवी :–** दिनांक 13.07.2022 ते दि. 16.05.2023 चे दरम्यान, **मौ. मांडवी ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी भारत फायनान्सियल इंक्लुजन लिमीटेड कंपणीचे संगम मॅनेजर यांनी कंपणीणे वाटप केलेल्या कर्जदाराकडुन बाकी राहिलेल्या कर्जाच्या रक्कमेची वसुली करून ती कंपणीकडे भरणा न करता त्याचे स्वतःच्या फादयासाठी 10,04,724/–रूपये वापरून खर्च करून कंपणीची फसवणुक व विश्वासघात केला आहे. वगैरे **फिर्यादी संजय अमृतराव मारेराव, वय 46 वर्षे, व्यवसाय नौकरी ब्रँच मॅनेजर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे फसवणुक** गुरन 46/2023 कलम 420, 408 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कऱ्हाळे, मो.नं. 8390434340** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 14.12.2021 चे 15.30 वा. चे सुमारास, **मा. जिल्हा न्यायालय नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बनावट दस्तऐवज आधार कार्ड तयार करून त्यावर फोटो लावुन फिर्यादी कडुन नगदी 10,00,000/–रूपये घेवुन फिर्यादीची आर्थीक फसवणुक केल्यामुळे मा. कोर्टाचे आदेशान्वये 156(3) सीआरपीसी प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. वगैरे **फिर्यादी सरोज भ्र. सुर्यकांत अनंतवार, वय 55 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. कॅनल रोड वाडी (बु) नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 194/2023 कलम 420, 465, 467, 471 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री भिसे, मो.नं. 9822987573** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**1)इतवारा :–** दिनांक 22.05.2023 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **पशुवैद्यकीय दवाखाण्याच्या बाजुला मोकळया जागेत बाभळेच्या झाडाखाली मॅफ्को परिसर नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 52,610/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/2558 मधुकर शंकरराव भिसे, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 158/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/802 शेख वाजीद, मो.क्रं. 02462–236510** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 22.05.2023 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **तांडा बारचे बाजुला सार्वजनिक रोडचे कडेला नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मीलन नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 5680/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3136, रमेश भगवानराव सुर्यवंशी, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 181/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2575 कांबळे, मो.क्रं. 9552303028** हे करीत आहेत.

## 6)विषारी औषध पिऊन आत्महत्या :–

**1)मुदखेड :–**दिनांक 22.05.2023 रोजी चे 10.35 वा. चे सुमारास, **प्रॉपर मुदखेड शिवार मयताचे फुल शेतात ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे दिलीप बाबाराव शेटे, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. मठ गल्ली मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड,** यांनी सततचे नापीकीला व बँकेचे कर्ज कसे फेडावे या कारणावरून कोणतेतरी विषारी औषध पिऊन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार बाबाराव नारायणराव शेटे, वय 74 वर्षे, व्यवसाय शेती रा. मठ गल्ली मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मुदखेड** आ. मृ. **14**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गिते, मो.नं. 9329115398** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 205 / 2023 दिनांक : 24.05.2023**

नांदेड पोलीस दलातर्फे पोलीस उप अधिक्षक यांना निरोप देण्यात आला.

पोलीस महासंचालक कार्यालयाकडुन नुकत्याच केलेल्या सर्वसाधरण बदल्या मध्ये नांदेड पोलीस दलातील तीन उपविभागीय पोलीस अधिकारी व दोन पदोन्नतीने बदली झाली आहे. यांना **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे हस्ते छोठे खानी कार्यक्रम घेवुन निरोप देण्यात आला.

सदर बदल्यामध्ये **मा. डॉ. सिध्देश्वर भोरे**, उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा यांची बदली पैठण संभाजीनगर ग्रामीण **मा. श्री सचिन सांगळे**, उपविभागीय पोलीस अधिकारी देगलुर यांची बदली जालना शहर, **मा. श्री. विक्रांत गायकवाड**, उपविभागीय पोलीस अधिकारी धर्माबाद, यांची बदली भुसावळ जि. जळगाव व पदोन्नती झालेले **प्रशांत देशपांडे**, यांची उपविभागीय पोलीस अधिकारी हिंगोली ग्रामीण **अनिल चोरमले**, उप विभागीय पोलीस अधिकारी म्हणुन अंबाजोगाई येथे बदली झाल्याने या सर्वांचा **मा. श्री. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे हस्ते शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमास **मा. श्री. अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री. गौहार हुसेन**, सहा. पोलीस अधिक्षक नांदेड ग्रामीण, **मा. श्री द्वारकादास चिखलीकर**, पोनि स्थागुशा, **मा. श्री साहेबराव नरवाडे**, पोनि पोस्टे विमानतळ **मा. श्री. अशोक घोरबांड**, पोनि पोस्टे नांदेड ग्रामीण, **मा. श्री. सुर्यमोहन बोलमवाड**, पोनि पोस्टे भाग्यनगर, **मा. श्री. मोहन भोसले**, पोनि पोस्टे शिवाजीनगर, **मा. श्री ज्ञानोबा देवकत्ते**, पोनि पोस्टे इतवारा **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड तसेच कार्यालयातील इतर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार मोठया संख्येने हजर होते.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन **मा. श्री. द्वारकादास चिखलीकर**, पोनि स्थागुशा यांनी केले तर आयोजन पोलीस कल्याणचे पोनि **श्री नामदेव रिठठे**, यांनी केले.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

